

संस्थापक - अध्यक्ष
मा.कै.बाबुरावजी काळे



अजिंठा शिक्षण संस्था संचलित,

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,सोयगांव

ता.सोयगांव जि.औरंगाबाद

## करियर गाईडन्स सेंटर विभाग

### (स्पर्धा परिक्षा, व्यवसाय मार्गदर्शन आणि प्लेसमेंट सेंटर)

**१ जानेवारी २०१८ पासुन नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या 'करियर गाईडन्स सेंटर (स्पर्धा परिक्षा, व्यवसाय मार्गदर्शन आणि प्लेसमेंट सेंटर)च्या वतीने आपल्या भावी जिवनाला नवी दिशा देणारे,आपली भव्य स्वप्ने पूर्ण करण्याऱ्या सेंटरच्या कार्यक्रमात सक्रीय भाग घ्यावे यासाठी हे अवाहन..**

आमच्या महाविद्यालयातील आणि सोयगांव परिसरातील सर्व विद्यार्थी/ विद्यार्थीनीसाठी या अवाहन पत्राद्वारे कळविण्यास आनंद होतो की, आपल्या महाविद्यालयात,आपल्या सर्वांसाठी करियर गाईडन्स सेंटर सुरु केलेले आहे. कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्या पासूनच आपण आपला नियमित बोर्ड आणि विद्यापीठाचा अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच आपल्या भावी जीवनात मोठे होण्यासाठी,आई वडीलांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सुरवातीपासूनच कठोर परिश्रम, जिद्द अभ्यास, शारिरीक, बौध्दीक व मानसिक क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. आपल्या कौटुंबीक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीत दोष न देता, प्रतिकुल परिस्थितीतूनच मार्ग काढावा.

आपले आई-वडील, भाऊ, बहिन, गुरुजन आणि मित्र यांच्या सहकाऱ्याने चर्चेद्वारे,विचारमंथन करुन एक क्षेत्र निवडा, अभ्यास करा, विविध परिक्षांना सामोरे जा सुरुवातीच्या काही अपयशाने खचु नका. अंतिम यश,विजय तुमचाच आहे.

यासाठी महाविद्यालयात नियमीत या प्रत्येक तासांना हजर रहा. ग्रंथालय, प्रयोगशाळा, कला, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना या आदी विभागांचा उपयोग करुन घ्या. कॉलेजच्या सर्व कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा. यातूनच तुमचे जीवन घडणार आहे. व्यक्तीमत्व विकसित होणार आहे. आपण, मला माझ्या सर्व सहकारी प्राध्यपकांना आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भेटा, बोला. तुमच्या अडी-अडचणी, तुमचे विचार, आम्हाला सांगा. चर्चेतूनच प्रश्न सुटत असतात. आम्ही तुमच्या साठी आहोत । तुमचे मित्रच आहोत.

**डॉ.अशोक नाईकवाडे**
प्राचार्य
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,सोयगांव
मो.नं.९८८१९०७३९३